# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

**दिनांक ३१/०८/२०२२ (बुधवार)**

**(सकाळ)**

---

## घरफोडी

**पो.स्टे. काटोल** :– अंतर्गत १२ कि. मी. अंतरावरील मौजा गोंडी डिग्रस येथे दि. २२/०८/२२ चे १४.०० वा. ते ३०/०८/२२ चे १६.०० वा. सुमारास फिर्यादी नामे– विजय दर्याव धपके वय ५९ वर्ष रा. गोंडी डिग्रस हा पत्नी सह घराला कुलूप लावुन मुलीकडे पुणे येथे गेले होते. त्यादरम्यान अज्ञात आरोपीने फिर्यादीचे घराचे दरवाज्याचे कुलुप कोंडा तोडुन घरात प्रवेश केला. यानंतर आरोपीने घरातील स्टोर्स रूममधील लोखंडी कपाटात ठेवलेले नगदी ५४,०००/– रू. व जुने वारते सोन्याचे लटकन किंमती १५,०००/–रू. असा एकुण कि. ६९,०००/–रू. चा मुद्देमाल अज्ञात आरोपीने चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. काटोल येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ४५४,४५७,३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि श्री जवाहर चव्हान पोलीस स्टेशन काटोल मो. क्र ९५४५३६३१२१ हे करीत आहे.

## चोरी

**१) पो.स्टे. कन्हान** :– अंतर्गत १.५ कि. मी. अंतरावरील विकास हायस्कुल मैदान येथे दि. २७/०८/२०२२ चे रात्री ०२.०० वा. २८/०८/२०२२ चे ०९.४५ वा. सुमारास फिर्यादी नामे– भुषण यशवंत घोरपडे, वय ३८ वर्ष, रा. जरीपटका नागपुर हे बीएसएनएल मध्ये नौकरी करीत असुन त्यांचे अधिकार क्षेत्रात विकास विद्यालय कन्हान चे प्रमाणित बीएसएनएल टावर येत असुन त्याची जवाबदारी फिर्यादी कडे आहे. अनिल पंधराम टेक्नीशियन चे साईड डाउन असल्यामुळे त्यांना टावरचे बाहेरचे लॉक तुटले दिसले. त्यांनी अशी माहीती फिर्यादीला सांगितल्याने फिर्यादीने तिथे जाउन पाहीले असता टावर मधील combiles-3 nos –rs19.200 (scrapvalue)tre 6 nos -–rs 18,000 (scrap value) असा एकुण ३७,२००/–रू. चा मुद्देमाल अज्ञात आरोपीने चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कन्हान येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सरतर्फे पोलिस हवालदार सहारे मो.नं. ९३०३९६६३९ हे करीत आहे.

२) पो.स्टे. कन्हान :— अंतर्गत बोरडा टोल नाका येथे दि. २८/०८/२०२२ चे १७.०० वा. २९/०८/२०२२ चे ११.०० वा. सुमारास फिर्यादी नामे— उमेश विठ्ठलराव कावळे, वय ६२ वर्ष, रा. मित्रविहार नगर, खरबी रोड प्लॉट नं. ७३ नागपुर यांची बोरडा टोल नाका व्हाइट लॉज जवळ कॅनल ला लागुन पावने ५ एकड शेती आहे. त्या शेती मध्ये धान पिक लावलेले आहे. फिर्यादी यांचे शेतात सामान ठेवण्याकरीता खोली बनवलेली होती तेथे त्यांचे आठवडयातुन दोन तीन दिवस येणे जाणे असायचे. त्या खोलीमध्ये फिर्यादी हे आले असता शेतामध्ये खुल्या जागेत असलेली खोली त्यांना उघडी दिसली व त्या खोलीमध्ये असलेली ५ हचपी हाउस पावर ची मशीन कि. १४,०००/—रू. व ४ खत कंच ची बॅग कि ५,४००/—रू. व दोन प्लॅस्टीक चेअर कि. ६००/—रू. असा एकुण कि. २०,०००/—रू. चा मुद्देमाल अज्ञात आरोपीने चोरून नेल्याचे दिसले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कन्हान येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सरतर्फे पोलिस हवालदार सहारे मो.नं. ९३०३९६६३९ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर